आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
८ नोव्हेंबर २०२६ -रवि वार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशभरात दीपावलीचा उत्साह
- प्रधानमंत्र्यांची दिवाळी बस्तरमधे सुरक्षादलांसमवेत साजरी
- इस्त्राएल मधे गादी आयसेनकोट यांना सरकारस्थापनेची संधी

**आणि**

- दक्षिण गोव्यातल्या पालोलेम अर्थात पाळोले ठरला आशियातला सर्वोत्तम समुद्र किनारा

<><><><><><>

दीपावलीचा सण आज सर्वत्र उत्साहाने साजरा होत आहे. तऱ्हेतऱ्हेचे दिवे, शोभिवंत रांगोळ्या, आकाशकंदील, तोरणं अशा विविधरंगी साजांनी घरं, दुकानं, गावं आणि शहरं सजली आहेत. मिठाईच्या दुकानांमधे गर्दी आहे, आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचीही रेलचेल आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिवाळी बस्तरमधे सुरक्षा दलांबरोबर साजरी केली. पूर्वी नक्षली कारवायांमुळे दहशतीखआली राहिलेला हा परिसर आता मोकळा श्वास घेत असल्याचं त्यांनी सांगितलं. तिथली सुरक्षितता आणि स्थैर्य यांचं श्रेय त्यांनी सुरक्षादलांच्या जवानांना दिलं....

**होल्ड- बाईट- प्रधानमंत्री**

महाराष्ट्रात नरकचतुर्दशी निमित्त आज पहाटे चंद्रोदयापूर्वी अभ्यंगस्नान, आणि फराळ करुन सर्वांनी दिवाळीचा आनंद लुटला. गावोगावी दिवाळीनिमित्त संगीत, नृत्य आणि मनोरंजनाचे अभिरुचीसंपन्न कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी राज्यातल्या दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी विशेष उपक्रम

राबवण्यात येत आहेत. त्यांना शिधा, फराळ, दिवे, सजावटीचं सामान इत्यादी वस्तूंचं वाटप करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरजवळ लोहारी सावंगा इथं दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांबरोबर दिवाळी साजरी केली. तिथल्या बाळपांडे कुटुंबासमवेत त्यांनी मुक्कामही केला. यावेळी त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. राज्यमंत्रिमंडळाचे इतर सदस्य देखील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेटून दिवाळी साजरी करत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या उपक्रमाचं कौतुक केलं आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारची शेतकऱ्याप्रति वचनबद्धता यातून दिसून येते, असं मोदी यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

परंपरेनुसार दिवाळीत लक्ष्मी पूजनानिमित्त देशांतर्गत शेयर बाजारात आज मुहुर्ताचे सौदे होणार आहेत. मुंबई शेअर बाजार आणि राष्ट्रीय शेअर बाजारात दुपारी दोन वाजून वीस मिनिटांपासून ते दुपारी साडेतीन वाजेपर्यंत हे मुहुर्ताचे सौदे होतील.

<><><><><>

परदेशातही अनेक ठिकाणी दिवाळी साजरी होत आहे. श्रीलंकेत भारतीय समुदायाने कोलंबो इथं रोषणाई करुन तसंच संगीत नृत्याच्या कार्यक्रमातून दिवाळीचा आनंद साजरा केला. अमेरिकेत न्यूयॉर्क आणि कॅनडात टोरांटो इथं भारतीयांसमवेत इतर दक्षिण आशियाई समुदायांनीही दिवाळीनिमित्त रोषणाई केली असून सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे.

<><><><><>

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज सिक्किम मधल्या नाथू ला जवळ असलेल्या शेरेथान्ग इथल्या युद्ध स्मारकाला भेट देऊन देशाच्या रक्षणासाठी बलिदान देणाऱ्या वीर शहिदांना आदरांजली वाहिली. या दुर्गम प्रदेशात देश रक्षणाचं

कार्य करत असलेल्या लष्करी अधिकाऱ्यांशी संरक्षण मंत्र्यांनी संवाद साधला. आव्हानात्मक परिस्थितीही देशाच्या सीमांचं रक्षण करणाऱ्या जवानाचं त्यांनी कौतुक केलं.

<><><><><>

भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपप्रधानमंत्री लालकृष्ण आडवाणी यांचा आज शंभरावा जन्मदिवस आहे. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह इतर मान्यवरांनी आडवाणी यांना शुभेच्छा दिल्या आहेत. एक लोकशाही म्हणून भारताच्या प्रवासात आडवाणींच्या प्रदीर्घ राजकीय वाटचालीचा आणि वचनबद्धतेचा मोठा वाटा असल्याचं उपराष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आडवाणींच्या जीवनावर लिहिलेला एक लेख समाजमाध्यमावर सामायिक केला आहे. सामान्य कुटुंबातून आलेले लालकृष्ण आडवाणी यांचा, भाजपाचे संस्थापक सदस्य, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, ते देशाचे उपप्रधानमंत्री हा प्रवास म्हणजे देश प्रथम या तत्त्वाचं उदाहरण आहे, असे गौरवोद्गार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काढले. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी, देशाच्या उभारणीत आडवाणींच्या योगदानाचं गौरव आपल्या पोस्टमध्ये केलं आहे. तर, राष्ट्रसेवेतलं त्यांचं योगदान आणि प्रदीर्घ सार्वजनिक जीवन सर्वांसाठी प्रेरणादायक असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. लालकृष्ण आडवाणींच्या १००व्या जन्मदिवसानिमित्त, भारतीय जनता पक्षाने नवी दिल्लीतल्या मुख्यालयात एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. लालकृष्ण आडवाणी यांचं व्यक्तिमत्त्व आणि आयुष्यातून नव्या पिढीनं प्रेरणा घ्यावी, असं प्रतिपादन भाजपाचे अध्यक्ष नितीन नबीन यांनी यावेळी बोलताना केलं. राष्ट्र प्रथम या तत्त्वाने त्यांनी देशाला पुढे नेण्याचा संकल्प केला, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

<><><><><>

इस्त्रायलमध्ये नवीन सरकार स्थापनेवरून राजकीय घडामोडींना वेग आला आहे. इस्त्रायलचे माजी लष्करप्रमुख आणि विरोधी पक्षनेते गादी आयसेनकोट यांना सरकार स्थापनेसाठी जनादेश मिळाला असून ते प्रधानमंत्री बनण्याची शक्यता आहे. विविध राजकीय पक्षांशी सल्लामसलत केल्यानंतर, इस्त्रायलचे राष्ट्रपती आयझॅक हर्झोग यांनी काल या निर्णयाची घोषणा केली. इस्त्रायलच्या १२० सदस्यीय संसदेत आयसेनकोट यांना ६७ सदस्यांचा पाठिंबा मिळाला असून नेतन्याहू यांना ४६ सदस्यांनी पाठिंबा दिला होता, तर सात सदस्य तटस्थ राहिले. आयसेनकोट याना आघाडी सरकार स्थापन करण्यासाठी २८ दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. या कालावधीत १४ दिवसांची वाढ केली जाऊ शकते. मात्र, या काळातही आयसेनकोट सरकार स्थापन करण्यात अयशस्वी ठरले तर हर्झोग दुसऱ्या उमेदवाराला संधी देतील. दरम्यान, निवडणुकीत बहुमत गमावणाऱ्या बेंजामिन नेतान्याहू यांनी राष्ट्रीय एकता सरकार स्थापन करण्याचं आवाहन करत विरोधकांना आपल्या सरकारात सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे. नेतान्याहू यांचा हा प्रस्ताव आयसेनकोट यांनी फेटाळला आहे.

<><><><><>

केरळमध्ये “शिगेला” या आजाराच्या संसर्गाची पुष्टी झाल्यानंतर राज्याच्या आरोग्य विभागानं प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक तीव्र केल्या आहेत. राज्यात सुमारे १३ संसर्ग बाधितांची नोंद झाल्याचं आरोग्य विभागानं सांगितलं आहे. संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य विभागानं सतर्कतेचा इशारा जारी केला असून, क्लोरिनेशन आणि इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक तीव्र केल्या आहेत.

<><><><><>

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवेपर्यंत आणि देशाची निवडणूक प्रणाली पारदर्शक होईपर्यंत काँग्रेसच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरूच

राहील, असं अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी स्पष्ट केलं. केरळममध्ये अलेप्पुझा इथं झालेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. या आंदोलनाचा एक भाग म्हणून काँग्रेस पुढच्या दीड महिन्यात पंचायत स्तरावर मत वाचवा, देश वाचवा ही देशव्यापी मोहीम सुरू करणार आहे. या मोहिमेंतर्गत प्रत्येक मतदान केंद्रावर एक मत रक्षक नियुक्त करण्यात येईल. हे मत रक्षक मतदार याद्यांची छाननी करतील, ज्यांची नावे वगळली गेली आहेत अशा व्यक्तींची ओळख पटवतील आणि त्यांच्या घरी जाऊन त्यांना पुन्हा नाव नोंदणी करायला मदत करतील, अशी माहिती वेणुगोपाल यांनी दिली. संसदेच्या आगामी अधिवेशनातही हा मुद्दा मांडला जाईल, असंही ते म्हणाले.

<><><><><>

दक्षिण गोवा भागातल्या पालोलेम अर्थात पाळोले समुद्र किनाऱ्याला आशियातला सर्वोत्तम समुद्र किनारा म्हणून घोषित करण्यात आलं आहे. बीच डॉट कॉम या संकेतस्थळाने प्रसिद्ध केलेल्या जगातल्या सर्वोत्तम समुद्रकिनाऱ्यांच्या यादीतही या किनाऱ्याला सहावं स्थान मिळालं आहे. या यादीत समाविष्ट होणारा पाळोले हा आशिया खंडातला एकमेव समुद्रकिनारा आहे. काणकोण तालुक्यातला हा किनारा अर्धचंद्राकृती असून त्याच्यावर पांढरी वाळू आढळते. या किनाऱ्याची गुणवत्ता, वाहतुकीची सोय, पाण्याची शुद्धता, उपलब्ध सुविधा अशा वैशिष्ट्यांसाठी हे मानांकन मिळालं आहे.

<><><><><>

नेपाळमध्ये २६ ऑगस्ट रोजी भोटेकोशी आणि त्रिशूली नद्यांना आलेल्या पुरात बेपत्ता झालेल्या लोकांना मृत घोषित करण्याची प्रक्रिया नेपाळ सरकारनं सुरु केली आहे. पहिल्या टप्प्यात २ हजार ४६५ लोकांना मृत घोषित करण्याची प्रक्रिया

सुरु आहे. यात १७१ विदेशी नागरिकांचाही समावेश आहे. या पूरात ५ हजार २८६ जण बेपत्ता झाल्याची नोंद असून यापैकी ६३६ जण परदेशी नागरिक आहेत.

<><><><><><>

जम्मू-काश्मीरमधील बारामुल्ला इथं आज पहाटे ५ वाजून २३ मिनिटांनी ३ पूर्णांक ३ दशांश रिख्टर तीव्रतेचा भूकंपाचा धक्का जाणवला. भूकंपाचा केंद्रबिंदू बारामुल्लापासून २० किलोमीटर खोलीवर होता. या धक्क्यामुळं कुठलीही जीवित अथवा वित्तहानी झाल्याचं वृत्त नाही.

<><><><><><>

पुरुषांच्या १९ वर्षांखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अ गटात आज भारताचा सामना पाकिस्तानविरुद्ध ओमान इथं होत आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ३९ षटकांत ७ बाद १७६ धावा झाल्या होत्या. अर्जुन राजपूतनं १०७ धावांची खेळी केली.

//<><><><><><>//

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
८ नोव्हेंबर २०२६ -रवि वार